चिचपल्ली नजिकच्या भिषण अपघातातील मृतकांच्या कुटूंबियांना मुख्यमंत्री निधीतुन 5 लाख रु चे अर्थसहाय्य जाहीर करावे

दिनांक १९ मे २०२२ रोजी चंद्रपूरकडे येणा-या डिझेल टँकर व लाकुड भरलेल्या ट्रकच्या घडकेत झालेल्या भिषण अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ९ व्यक्तींना तातडीने प्रत्येकी ५ लक्ष रूपयांचे अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन जाहीर करावे अशी मागणी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव विकास खारगे यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली .त्यांनी सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिले.

दिनांक १९ मे रोजी चिचपल्लीजवळ लाकुड भरलेल्या ट्रकच्या आणि डिझेल टँकर मध्ये जोरदार धडक झाली. दोन्ही वाहनांचे चालक भरधाव वेगाने वाहने चालवित असल्याने झालेल्या धडकेत डिझेल टँकरचा स्फोट होवून दोन्ही वाहनांना आग लागली व या आगीमध्ये लाकुड भरलेल्या ट्रकमधील सात व्यक्ती व डिझेल भरलेल्या टँकरमधील दोन व्यक्ती अशा एकूण ९ व्यक्ती जळून मरण पावल्या. ही अतिशय भिषण घटना आहे. या अपघातात दोन्ही वाहनांचे चालक कारणीभूत आहेत. त्यांच्यामुळे निरपराध व्यक्तींना प्राण गमवावे लागले. त्यामुळे तातडीने या मृतकांच्या कुटूंबियांना प्रत्येकी ५ लक्ष रूपयांचे अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन जाहीर करण्याची आवश्यकता आहे. मुख्यमंत्र्यांनी या घटनेची गंभीर दखल घेत तातडीने अर्थसहाय्य जाहीर करावे अशी मागणी केली आहे.

दरम्यान रुग्णालयात जाऊन मृतकांच्या कुटुंबियांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. भारतिय जनता पार्टी पूर्ण शक्तिनिशी आपल्या पाठीशी असल्याची ग्वाही मृतकांच्या कुटुंबियांना दिली.

राज्यात रस्ते अपघात दिवसेंदिवस मोठया प्रमाणावर वाढ होत आहे. दारू पिऊन बेधुंदपणे वाहने चालविली जातात. या मद्यपी चालकांमुळे निरपराध लोकांचे जीव जातात व त्यांची कुटूंबे उघडयावर पडतात. अशा परिस्थीतीत मद्यपी वाहन चालकांमुळे नाहक आयुष्य उध्दवस्त झालेल्या अनेक निराधार कुटूंबांना नुकसान भरपाई म्हणून आर्थीक मदत शासनाच्या महसुल उत्पन्नातुन देण्याची मागणी करणारे अशासकीय विधेयक येत्या विधानसभा अधिवेशनात आपण मांडणार असल्याचे म्हटले.

सत्यमेव जयते
**सुधीर स. मुनगंटीवार**
विधानसभा सदस्य
समिती प्रमुख - विधीमंडळ लोकलेखा समिती
तथा माजी कॅबिनेट मंत्री (महाराष्ट्र)

जा.क्र. २१४४/मे/२०२२
दिनांक : २०.५.२०२२

प्रति,

**मा. ना. उध्दवजी ठाकरे**
मुख्यमंत्री
महाराष्ट्र शासन

सप्रेम नमस्कार....

**विषयः** चंद्रपूर जिल्हयातील अजयपूरजवळ मुल रोड येथे झालेल्या भिषण अपघातातील ९ मृत व्यक्तींच्या कुटूंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी उपलब्ध करून देण्याबाबत.

**महोदय,**

चंद्रपूर जिल्हयातील अजयपूरजवळ मुल रोड येथे दिनांक १९ मे २०२२ रोजी रात्री १०.३० ते ११ वा. च्या सुमारास डिझेलने भरलेला टँकर व लाकडाने भरलेला ट्रक यामध्ये आमोरासमोर धडक झाल्याने डिझेल टँकरचा स्फोट होवून दोन्ही वाहनांना भिषण आग लागली व आगीमध्ये लाकडाने भरलेल्या ट्रकमधील सात व्यक्ती व डिझेलने भरलेल्या टँकरमधील दोन व्यक्ती असे एकूण ९ व्यक्तींचा मृत्यु झालेला आहे. या दुःखद घटनेमुळे मृतकांच्या कुटूंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन आर्थीक मदत करणे आवश्यक आहे. या भिषण अपघातात खालील व्यक्तींचा दुर्देवी मृत्यु झाल्याचे कळते.

१. अक्षय सुधाकर डोंगरे, वय ३० वर्षे (रा. बीटीएस प्लॉट, बल्लारपूर जि. चंद्रपूर)
२. प्रशांत मनोहर नगराळे, वय ३२ वर्षे (रा. लावारी, ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर)
३. मंगेश प्रल्हाद टिपले, वय ३५ वर्षे (रा. लावारी, ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर)
४. महिपाल आनंदराव मडचापे, वय २५ वर्षे (रा. लावारी, ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर)
५. बाळकृष्ण तुकाराम तेलंग, वय ४६ वर्षे (रा. लावारी, ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर)
६. साईनाथ बापूजी कोडाप, वय ३० वर्षे (रा. लावारी, ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर)
७. संदीप रविंद्र आत्राम, वय २२ वर्षे (रा. तोहोगांव, ता. गोंडपिपरी जि. चंद्रपूर)
८. हफीज खान, वय ३२ वर्षे (रा. अमरावती)
९. सुखदेव चंतपराव कैकाडी, वय ५३ वर्षे (रा. मोरांगणा पो. खरांगणा ता. आर्वी जि.वर्धा)

वरील व्यक्तींची कौटूंबिक व आर्थीक परिस्थीती अत्यंत हलाखिची आहे. त्यामुळे मृत व्यक्तींच्या कुटूंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत आर्थीक सहाय्य करणे आवश्यक आहे. त्यामुळे मृत



गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र), दूरध्वनी : 07172 - 252582, 258800 7722074199
Email : sudhirbhau.mungantiwar@gmail.com, bjp03069@gmail.com, Office Whatsapp 9552799608

सत्यमेव जयते
सुधीर स. मुनगंटीवार
विधानसभा सदस्य
समिती प्रमुख - विधीमंडळ लोकलेखा समिती
तथा माजी कॅबिनेट मंत्री (महाराष्ट्र)



व्यक्तींच्या कुटूंबियांना प्रत्येकी ५ लाख रूपये आर्थीक मदत मंजूर करण्याकरिता आपण स्वतः जातीने लक्ष देवून संबंधितांना योग्य आदेश द्यावेत, अशी मी आपणास विनंती करीत आहे.

कार्यवाहीची सविस्तर रूपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

सविनय धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

१. मा. श्री. खारगे साहेब, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, म.रा.
२. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
३. मा. पोलिस अधिक्षक, चंद्रपूर
४. श्री. चंदनसिंहजी चंदेल, माजी अध्यक्ष वनविकास महामंडळ, म.रा.
४. श्री. देवराव भोंगळे, अध्यक्ष भाजपा चंद्रपूर जिल्हा मु.पो. घुग्गुस ता. जि. चंद्रपूर
६. श्री. हरीशजी शर्मा, माजी नगराध्यक्ष नगर परिषद, बल्लारपूर जि. चंद्रपूर
७. श्री. ब्रिजभूषण पाझारे, माजी जि.प. सदस्य, नकोडा पो. सिमेंटनगर, ता. जि. चंद्रपूर
८. श्री. लखनसिंहजी चंदेल, रा. बल्लारपूर जि. चंद्रपूर
९. श्री. किशोर पंदिलवार, तालुकाध्यक्ष भाजपा बल्लारपूर जि. चंद्रपूर
१०. श्री. रमेश पिपरे, तालुका सरचिटणीस भाजपा बल्लारपूर जि. चंद्रपूर
११. ॲड. श्री. हरीशजी गेडाम, माजी जिल्हा परिषद सदस्य, मु.पो. बामणी ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर
१२. श्री. गौतमजी निमगडे, माजी जि.प. सदस्य, मु.पो. चिचपल्ली ता. जि. चंद्रपूर
१३. श्री. गुणवंत भोयर, मु. लावारी, पो. बामणी ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर
१४. श्री. गोविंदा नामदेव डाहुले, मु. लावारी, पो. बामणी ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर
१५. श्री. उमेश वारलु इसनकर, मु. लावारी, पो. बामणी ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर
१६. श्री. अमोलजी कोडापे, मु. लावारी, पो. बामणी ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर
१७. श्री. सचिन बाबुराव भोयर, मु. लावारी, पो. बामणी ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर

133

गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र), दूरध्वनी : 07172 - 252582, 258800 7722074199
Email : sudhirbhau.mungantiwar@gmail.com, bjp03069@gmail.com, Office Whatsapp 9552799608